
ePaper
|| वर्ष - 6 | अंक - 353 || UDYAM-MH-26-0158827 ||
# महाईन्यूज(TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार, दि. 13 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## सगळे आमदार हळूहळू शिंदे सरकारला सोडून जातील": एकनाथ खडसे




### आतील पानांत
- नगर रस्त्यावरील अतिक्रमणे
- दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करावी
- कर्नाटक भाजपात फूट?

# भोसरीत सुमारे 37 हजार राष्ट्रप्रेमींचा प्रखर हिंदूत्वाचा हुंकार!

- महाराष्ट्रातील सर्वात मोठी सावरकर गौरव यात्रा
- भाजपासह समविचारी पक्षांचे शक्तीप्रदर्शन

**| पिंपरी | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी**

**" भारत माता की जय, जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, मी सावरकर, आम्ही सावरकर..." असा गगनभेदी घोषणा, ढोल-ताशा पथकाचा निनाद आणि सुमारे ३७ हजार राष्ट्रप्रेमी नागरिकांच्या साक्षीने भोसरी विधानसभा मतदार संघात राज्यातील सर्वात मोठी 'सावरकर गौरव यात्रा' संपन्न झाली.**



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या सन्मानार्थ संपूर्ण महाराष्ट्रात भाजपा-शिवसेना महायुतीच्या पुढाकाराने सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहेत. भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे यांच्या पुढाकाराने बुधवारी भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

भोसरी पीएमटी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून यात्रेला प्रारंभ करण्यात आला. तेथून दिघी रोड, हरी ओम स्वीट, आळंदी रोड, कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे यात्रेची सांगता करण्यात आली. यावेळी चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेमंत हरहरे, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, माजी सभापती एकनाथ पवार, गोरक्षक शिवशंकर स्वामी, स्थायीचे माजी सभापती विलास मडिगेरी, नितीन लांडगे, संतोष लोंढे, यांच्यासह भाजपा- शिवसेना महायुतीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद यासह भाजपा परिवातील सर्व संस्था, संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

गेल्या १५ दिवसांपासून सावरकर गौरव यात्रेची तयारी सुरू होती. मतदार संघातील महापालिका प्रभागनिहाय सावरकर प्रेमी नागरिकांना यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे यात्रेला गर्दी झाली. पोलीस प्रशासनाच्या अचूक नियोजनामुळे यात्रा यशस्वी झाली. सावरकर प्रेमी नागरिक आणि हिंदूत्ववादी विचारांच्या कार्यकर्त्यांनी उत्सहात यात्रेत सहभाग घेतला.




> **"हिंदू हित की बात करेगा, वहीं देश पे राज करेगा!"**
>
> - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा.

### भोसरी आणि परिसर भगवामय...

भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरम्, वीर सारकरांचा विजय असो, हिंदू हित की बात करेगा वहीं देश पे राज करेगा..! अशा घोषणा सहभागी सावरकर प्रेमी नागरिकांनी दिल्या. ढोल-ताशा पथकाचा खणखणाट, डोक्यावर सावरकर टोपी, हातात 'आम्ही सावरकर' असे फलक, भगव्या टोप्या त्यावर 'मी सावरकर' चा उल्लेख, महिलांची लक्षणीय उपस्थिती, वीर सावरकरांचा पोशाख केलेल्या व्यक्तीबरोबर सेल्फीचा आनंद, भगवा ध्वज दिमाखात फडकवताना कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. त्यामुळे भोसरी आणि परिसर अक्षरश: भगवामय झाला होता. "सावरकरांनी अंदमानला शिक्षेसाठी घेवून जाताना समुद्रात घेतलेली उडी..." असा देखावा नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. प्रभू श्रीराम आणि अयोध्येतील श्रीराम मंदिराचा चित्ररथ, कमळाच्या प्रतिकृतीमध्ये ठेवलेला वीर सावरकरांचा पुतळा लक्ष वेधून घेत होता.

# अतिक्रमणांवर कारवाईचा बडगा!

## पुणे महापालिकेकडून बेकायदा बांधकामे करणाऱ्यांवर संयुक्त कारवाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नगर रस्त्यावरील वाहतुक कोंडी, अतिक्रमणे, बेकायदा बांधकाम यांसहसह विविध प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी या महिन्यापासून कारवाईला सुरुवात केली जाणार आहे. अन्य विभागांना समवेत घेऊन महापालिकेकडून अतिक्रमणे, बेकायदा बांधकाम यांसारखे बेकायदेशीर प्रकार करणाऱ्यांवर संयुक्त कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.**



नगर रस्त्यावर मागील काही वर्षापासून मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहे. परिणामी रस्त्यांवर सातत्याने वाहतुक कोंडी होत असून त्यामुळे वाहनचालक अक्षरशः त्रस्त झाले आहे. पादचाऱ्यांना चालण्यासाठीही पदपथ उपलब्ध होत नसल्याची नागरीकांची तक्रार आहे.

या सगळ्या प्रश्नांबाबत नागरीकांकडून महापालिकेकडे सातत्याने तक्रारी केल्या जात होत्या. संबंधित तक्रारींची दखल घेऊन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्यासह विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन समस्या जाणून घेतल्या होत्या.

त्यावेळी अनधिकृत बांधकामे, रस्ते व महामार्गावरील अतिक्रमणे, पदपथांची दुरावस्था, बेकायदा पार्कींग यासह विविध प्रश्न पुढे आले. मात्र वडगाव शेरी, वाघोली, चंदननगर परिसरामध्ये पुणे नवनगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांचाही संबंध असल्याने ढाकणे यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली.

> ""नगर रस्त्यावरील सर्व प्रश्न राज्य सरकारच्या विविध विभागांशी संबंधित आहेत. त्यानुसार, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची बैठक घेऊन संयुक्त कारवाई करण्याचे निश्चित झाले आहे. या महिन्यात हि कारवाई सुरु होईल."
>
> - **विकास ढाकणे,** अतिरीक्त आयुक्त, पुणे महापालिका

त्यावेळी नगर रस्त्यावरील प्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेच्या पुढाकारातुन संयुक्त कारवाई करण्याचे निश्चित झाले. त्यानुसार, आता तिन्ही विभाग संबंधित ठिकाणी एकाचवेळी संयुक्त कारवाई करणार आहेत. अतिक्रमण, बेकायदा बांधकाम व अन्य बेकायदेशीर प्रकार करणाऱ्यांना नोटीस बजावण्यात येणार आहे.

एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. पदपथांवरील अतिक्रमणे काढून तेथे रेलींग लावण्यात येणार आहेत. महामार्गावरील ठिकठिकाणी तोडलेले दुभाजकांची कामे केली जाणार आहेत. रस्त्याच्याकडेली असणारी अतिक्रमणेही काढली जाणार आहेत.

---

## महाविकास आघाडीतील पक्षांनी एकमताने काम करावे: शरद पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही प्रश्नाबाबत वेगळी मते असली तरी महाविकास आघाडीमध्ये जे पक्ष एकत्रित आहेत. त्या सर्वांनी एकमताने आणि एकविचाराने काम करावे, अशा प्रकारची आमच्यामध्ये चर्चा झाली. काही कार्यक्रम आखण्यात आले असून त्यात सर्वांनी सहभागी व्हावे, अशी चर्चा झाली आहे, अशी माहितीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज पुण्यातील निवासस्थानी आगमन झाले त्या वेळी दिली. त्या वेळी उद्धव ठाकरे आणि तुमच्या दोघांची भेट झाली. त्यावरून अनेक चर्चा सुरू झाल्या. त्या प्रश्नावर शरद पवार यांनी भूमिका मांडली.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची एका न्यूज चॅनेलवर झालेल्या मुलाखतीमधील



अनेक विधाने सध्या चर्चेत आहेत. त्यानंतर ठाकरे गटाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांची 'सिल्व्हर ओक'वर जाऊन भेट घेतली. त्या वेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत संजय राऊत हे देखील उपस्थित होते. या दोन्ही नेत्यांच्या अचानक भेटीमुळे आगामी कालावधीत काही राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान शिवसेनेचे नेते मंत्री शंभुराजे देसाई यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीबाबत पुण्यात पत्रकार परिषद घेऊन खरपूस समाचार घेतला. त्या सर्व घडामोडीदरम्यान आज पुण्यातील मोती बाग येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्या भेटीबद्दल भूमिकाही या वेळी मांडली.

---

# पीएमआरडीएमधील मोठ्या गृहसंकुलांना 'यूडीसीपीआर' लागू

## राज्य सरकारचे आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) संपूर्ण क्षेत्राला 'एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली' (यूडीसीपीआर) लागू करण्याऐवजी केवळ मोठ्या गृहसंकुलांना (टाऊनशिप) ती लागू करण्यात आली आहे. त्यामुळे या बांधकाम नियमावलीचा सर्व नागरिकांना फायदा होण्याऐवजी काही मोजक्या जणांचा फायदा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे अवर सचिव प्रणव कर्पे यांनी याबाबतचे आदेश प्रसृत केले. पीएमआरडीएच्या हद्दीत सुमारे दहा ते बारा टाऊनशिप प्रस्तावित आहेत. या आदेशामुळे टाऊनशिपला वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (फ्लोअर स्पेस इंडेक्स – एफएसआय) मिळेल, मोकळ्या भूखंडांचे बंधन नाही, हस्तांतरण विकास हक्क (ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राइट्स – टीडीआर) वापरण्यास परवानगी, चालू बाजार मूल्यदरातील (रेडीरेकनर) दर कमी असल्यामुळे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (प्रिमिअम एफएसआय) कमी खर्चात मिळेल, साईड मार्जिनसह अनेकांमध्ये सवलती असे विविध फायदे या प्रस्तावित टाऊनशिपला या आदेशामुळे मिळणार आहेत. सध्या पीएमआरडीएच्या हद्दीला 'यूडीसीपीआर' नियमावली लागू नाही. ती लागू झाली असती, तर पीएमआरडीएच्या हद्दीचा झपाट्याने विकास झाला असता. मात्र, सरकारने पीएमआरडीएच्या संपूर्ण हद्दीचा विचार न करता केवळ काही लोकांना त्याचा फायदा दिल्याचे या आदेशावरून स्पष्ट झाले आहे.



### समाविष्ट गावांतील टाऊनशिपना आदेश लागू

» राज्य सरकारने पीएमआरडीएच्या हद्दीतील २३ गावे वगळून पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट केली. मात्र, या गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडे ठेवले. त्यामुळे ही २३ गावे वगळून महापालिकेच्या सर्व हद्दीत यूडीसीपीआर नियमावली लागू आहे. मात्र, या गावात अद्याप ती लागू नाही. या गावातील टाऊनशिपला मात्र ती या आदेशाने लागू झाली आहे.

# आरोग्य विभागाचा बेजबाबदारपणा!

## आकुर्डीत नाल्यात बसून राष्ट्रवादीचे आंदोलन : राष्ट्रवादी, मनसे अन् आपच्या पदाधिकाऱ्यांची वज्रमूठ

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आकुर्डी भागातील नालेसफाई वेळोवेळी होत नसल्याने राष्ट्रवादीचे पिंपरी विधानसभा कार्याध्यक्ष इखलास सय्यद यांनी नाल्यात बसून उपोषण केले.आकुर्डी भागातील नाले सफाई वेळोवेळी होत नाही. आरोग्य विभागाला वारंवार सूचना देऊन देखील दखल घेत नसल्याने सय्यद यांनी उपोषण केले. उपोषणस्थळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती.**



उपोषणाला माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, आम आदमी पार्टीचे कार्याध्यक्ष चेतन बेंद्रे, मनसेचे संघटक के. के. कांबळे आदींनी भेट दिली. तत्पूर्वी पहाटे लवकरच 25 ते 30 आरोग्य कर्मचारी नाल्यात उतरून साफ सफाई करून घेत असल्याचे दिसून आले. अ क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे , आरोग्य निरीक्षक साळवे, आरोग्य सहायक शिंदे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण मागे घेण्याची विंनती केली. राष्ट्रवादीचे इखलास सय्यद यांनी लेखी आश्वासन द्या तरच मागे घेऊ अशी भूमिका घेतल्यानंतर आरोग्य विभागाने सात दिवसाच्या आत सर्व नाले सफाई करून देऊ असे लेखी आश्वासन दिले. यानंतर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ यांच्या शिष्टाईनंतर उपोषण मागे घेत असल्याची घोषणा इखलास सय्यद यांनी केली.

### आंदोलनकर्त्यांचा इशारा अन् प्रशासन वळणीवर!

**» या उपोषणाला ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णा कुराहडे, अण्णा भोसले, प्रकाश परदेशी,फैज शेख, गौतम बेंद्रे,वसंत सोनार,यशवंत भालेराव,हरिभाऊ हांडे,चंद्रकांत इंगळे,सतिश सिलम, सुनील मोरे,सुरज मोरे, जिब्राईल शेख, रुपेश जोशी, किरण वाळुंज ,भास्कर म्हस्के, संजना सुर्वे,प्राजक्ता वाहळकर, विमल हांडे,अलका परदेशी,आशा साले,स्वाती म्हस्के,शोभा राऊत,अनिता पवार,मंगल खवले,अपेक्षा ठोंबरे,नीलम गडदे आदी उपस्थित होते. सात दिवसात नाले सफाई न झाल्यास पुन्हा नाल्यात 5 दिवसाचे उपोषण करण्यात येईल असा इशारा यावेळी सय्यद यांनी दिला.**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त

# पिंपरीतील वाहतुकीत बदल

## » पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांच्या सूचना : वाहतूक विभागाचे नियोजन

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शुक्रवारी (दि. 14) सर्वत्र साजरी होत आहे. जयंती निमित्त पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जयंती आणि इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी शुक्रवारी मोठ्या प्रमाणात अनुयायी पिंपरी चौकात येत असतात. त्या पार्श्वभूमीवर पिंपरी वाहतूक विभागांतर्गत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. ही बदल शुक्रवारी दुपारी तीन पासून मिरवणूक संपेपर्यंत असतील. याबाबत पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी सूचना दिल्या आहेत.**

महावीर चौक चिंचवड कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतूक बंद असेल. ही वाहतूक डी मार्ट ग्रेड सेपरेटरमध्ये वळविण्यात येईल.

नाशिक फाट्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरीकडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतूक बंद असेल. ही वाहतूक डेअरी फार्म ग्रेस सेपरेटर इन व एच पी पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इन मधून वळविण्यात येईल.

स्व. इंदिरा गांधी उड्डाणपूल येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे येणारी वाहतूक बंद असेल. ही वाहतूक उड्डाणपुलावरून मोरवाडी चौकाकडे जाईल.

नेहरूनगर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणारी वाहतूक बंद असेल. ही वाहतूक एच ए कॉर्नर बस स्टॉप येथून मासुळकर कॉलनीकडे वळविण्यात येईल.

जय मल्हार खानावळ सम्राट चौक येथून मोरवाडी चौकाकडे जाणारा मार्ग वाहतुकीसाठी बंद असेल.

सायन्स पार्क कडून मोरवाडी



चौकाकडे येणारा मार्ग बंद असेल. ऑटो क्लस्टर कडून येणारी वाहतूक मदर टेरेसा ब्रिजकडे बालविण्यात येईल.

क्रोमा शोरूम कडून गोकुळ हॉटेलकडे जाणारी वाहतूक बंद असेल.

पिंपरी चौकाकडून स्व. इंदिरा गांधी उड्डाणपुलाकडे जाणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद केली जाईल.

हॅरिस ब्रिज दापोडी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, दापोडी गाव या दरम्यान सहा मिरवणुका निघणार आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भोसरी वाहतूक विभागांतर्गत दापोडी येथून वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

हॅरिस ब्रिज ते फुगेवाडी चौक सर्व्हिस रोडने जाणारा मार्ग बंद असेल. या मार्गावरील वाहतूक हॅरिस ब्रिजने ग्रेड सेपरेटर मधून जाईल.

बोपोडी संविधान चौकाकडून दापोडी शिवाजी पुतळा येथे जाणारा मार्ग बंद असेल. या मार्गावरील वाहने हॅरिस ब्रिज दापोडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

शितळा देवी चौकाकडून दापोडी गावाकडे जाणारा मार्ग बंद असेल. या मार्गावरील वाहतूक शितळा देवी चौकाकडून सांगवी मार्गे इच्छित स्थळी जाईल.

## ११ जूनला ज्ञानेश्वरांच्या

# पालखीचे प्रस्थान

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी वारी पालखी सोहळा 2023 चा दिनक्रम श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान यांच्या कडून जाहीर झाला असून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान 11 जून रोजी होणार आहे. याबाबत ज्ञानेश्वर वीर महाराज यांनी माहिती दिली.**

11 जून रोजी सायं 4 वाजता श्रींच्या पालखीचे मंदिरातून प्रस्थान होऊन रात्रीचा मुक्काम (गांधी वाडा) दर्शन मंडप इमारत आळंदी देवस्थान येथे होणार आहे. 12 जून रोजी आळंदीहुन पालखी पुण्याकडे प्रस्थान होणार आहे. त्या रात्री व 13 जूनच्या रात्री पर्यंत पालखी विठोबा मंदिर, भवानी पेठ येथे मुक्कामी असणार आहे.

**पुढील प्रमाणे पालखी मुक्काम –**

14 जून रोजी पुण्याहून सासवडकडे प्रस्थान, 15 जून रोजी सासवड मुक्कामी, 16 जून जेजुरी, 17 जून वाल्हे, 18 जून श्रींचे नीरा स्नान, लोणंद, 19 जून लोणंद मुक्कामी, 20 जून (चांदोबाचा लिंब उभे रिंगण पहिले) तरडगाव, 21 जून विमानतळ फलटण, 22 जून बरड, 23 जून नातेपुते, 24 जून (पुरंदवडे गोल रिंगण पहिले) माळशिरस, 25 जून (खुडूस फाटा गोल रिंगण दुसरे) रात्री वेळापूर मुक्कामी, 26 जून (ठाकूर बुवाची समाधी गोल रिंगण तिसरे), (पहिला टप्पा संत सोपानदेव भेट) रात्री भंडीशेगाव मुक्कामी, 27 जून (बाजीरावची विहीर उभे रिंगण दुसरे), गोल रिंगण चौथे, रात्री वाखरी मुक्कामी, 28 जून (पादुका जवळ आरती व उभे रिंगण तिसरे) पंढरपूर, 29 जूनला पंढरपूर येथे आषाढी एकादशी सोहळा साजरा होईल.

**पुढील प्रमाणे पालखीचे प्रस्थान –**

3 जुलै पौर्णिमेपर्यंत सोहळा विठ्ठल नगरीत विसावेल. 3 जुलैला गोपालकाला होऊन सोहळा परतीच्या प्रवासासाठी आळंदीकडे निघणार आहे. परतीचा प्रवास 3 जुलै वाखरी, 4 जुलै वेळापूर, 5 जुलै नातेपुते, 6 जुलै फलटण, 7 जुलै पाडेगाव, 8 जुलै वाल्हे, 9 जुलै सासवड, 10 जुलै हडपसर, 11 जुलै पुणे, 12 जुलै आळंदी, 13 जुलै आळंदी नगरप्रदक्षिणा, हजेरी मारुती मंदिर नारळ प्रसाद, श्री माऊलीं मंदिर.

## संपादकीय

# अवकाळीचा मुकाबला

***राज्यातील कोकण, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण व उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ अशा सर्वच भागांवर अवकाळीचे संकट आहे. पुणे, नगर, सोलापूर, नाशिक, पश्चिम विदर्भ आणि मराठवाडा या भागातील जिल्ह्यांत नुकसानीचे प्रमाण अधिक आहे.***

खरं तर अलीकडील काही वर्षांत महाराष्ट्रात अवकाळीचे तडाखे वाढलेले आहेत. यंदा तर हिवाळ्यापासूनच अवकाळी पावसाचे वरचेवर आगमन होत आहे. अलीकडे एक मार्च ते दहा एप्रिल दरम्यान देशभरातील स्थिती बघितली तर ८० टक्के अवकाळी पाऊस हा एकट्या महाराष्ट्रात कोसळला; देशाच्या उर्वरित भागात हे प्रमाण अवघे २८टक्के आहे.

या आपत्तीने राज्यातील सुमारे दोन लाख हेक्टरवरील पिके, फळबागा आणि भाजीपाला पिकांना थेट नुकसान पोहोचविले आहे. मार्च महिन्यात तिसरा आठवडा वगळता सर्व आठवडे असा तीनदा, तर एप्रिलच्या पहिल्या दोन्ही आठवड्यात अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि काही ठिकाणी जोरदार गारपीट झाली.

परिणामी महाराष्ट्राची ओळख असलेला आंबा, काजू, कोकम, द्राक्ष, संत्रा, केळी, कलिंगड या फळांसह गहू, कांदा, मका, हरभरा तसेच भाजीपाला इत्यादी पिकांचेही मोठे नुकसान झाले. वीज कोसळून जनावरे दगावली. वादळी वाऱ्याने झाडे उन्मळल्याने मनुष्य जीवितहानीही झाली. त्यामुळे राज्यभरात चिंतेचे वातावरण आहे.

अवकाळीचे थैमान असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसह राज्य सरकार अयोध्या दौऱ्यावर गेल्याने टीका झाली. परंतु तेथून परतताच मुख्यमंत्री थेट बांधावर गेले. युद्धपातळीवर पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यामुळे यंत्रणा अंग झटकून कामाला लागली आहे. पंचनाम्यांनुसार सरकारी मदतही जाहीर होईल.

पण हा केवळ दिलासा! या मदतीतून झालेले नुकसान भरून निघणारे नाही, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रावर दरवर्षी ओढवणाऱ्या या अवकाळी संकटाबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही वर्षांची स्थिती बघितली तर दरवर्षी हिवाळी संपणे आणि उन्हाळ्याला सुरुवातीच्या काळात अवकाळी पाऊस, वादळ आणि गारपिटीचे संकटे ओढवत आहेत.

# अघोरी उपचार करणारे बाबूजी महाराज संस्थान!




**अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात पारस येथील बाबूजी महाराज संस्थान मधील दुर्घटनेत ज्या सात ,आठ भाविकांना आपला प्राण गमवावा लागला त्यांच्या कुटुंबियांना अजूनही या दुःखातून सावरता आले नाही. नातेवाईकांना सरकारी मदत मिळेल,जखमींवर मोफत उपचार होतील मात्र झालेली हानी कधीही भरून निघणार नाही.**

दर रविवारी या संस्थानांवर हजारो भाविक गोळा होतात. दिवसभर शांतता असते आणि नेमका रात्री दहा नंतर इथे मूळ कार्यक्रम सुरु होतो,तो पहाटे पर्यंत बिनबोभाट सुरु असतो. जी वेळ सर्वोच्च न्यायालयाने शेवटची ठरवून दिली नेमके त्याच वेळी कार्यक्रम सुरु करून रात्रभर अंधश्रद्धेचे थैमान घालणारा हा कार्यक्रम अकोला जिल्हा प्रशासनाच्या नाकावर टिच्चून कसा काय सुरु असतो हे कोडे अजून सुटले नाही. असे काय महत्वाचे असते की जे रात्री दहा नंतर सुरु होते ? तर हा असतो "दुःख निवारण दरबार" अंगात बाबूजी महाराज आल्याचे नाटक करीत मानसिक रुग्णांना छळण्याचा भयानक प्रकार .अघोरी उपचार करण्याचा अन कायदे पायदळी तुडविण्याचा धिंगाणा. लोक असे सांगतात की पारस गावात दीडशे वर्षांपूर्वी भटक्या विमुक्त समूहाची तात्पुरती राहुटी जंगलात होती,त्याचकाळात राहुटी सोडताना देवाला बळी देण्याची प्रथा होती त्यानुसार या समूहाने एका बालकाचा बळी दिला ,या समूहाला एकाच ठिकाणी जास्तकाळ थांबणे शक्य नसते म्हणून बाळाचा जड अंतःकरणाने दफनविधी आटोपून हा समूह निघून जातो. पुढे काही काळाने बाळाच्या समाधीवर लोकांना फुले,कुणाला बाण तर कुणाला दगड वर आलेला दिसतो. शेतातील या दगडाला अर्थात भाविकांच्या मनातील देवाला पुजण्याची परंपरा सुरु होते. खेड्यात लहान मुलाला बाबू म्हणतात, तोवर हा बाबू भाविकांच्या दृष्टीने चमत्कारी असतो. पुढे आदर वाढत जातो आणि बाबूजी महाराज म्हणून लोक दरवर्षी पूजा करायला लागतात तेच आजचे हे बाबूजी महाराज संस्थान. पारस गावातही बाबूजी महाराज यांचा मूळ इतिहास,काळ किंवा अधिकृत माहिती कुणाकडे मिळत नाही. आजच्या पाच वारसदार घराण्यातील लोकांनी दिलेली माहिती सुद्धा परस्परांशी जुळत नाही.

मूळ मुद्दा इतिहास संशोधन हा नाही. कुणाला मानावे,कुणाची पूजा अर्चा करावी याचे सगळ्यांना स्वातंत्र्य आहे मात्र लोकांची दिशाभूल करून गर्दी गोळा करणे आणि आजच्या काळातील आधुनिक उपचार सोडून त्यांच्यावर अघोरी उपचार करणे हे अनेक कायद्यांचे सर्रास होणारे उल्लंघन आहे. याच अघोरी उपचारासाठी जमा झालेल्या जमावावर मंदिर परिसरातील झाड कोसळल्यामुळे सात भाविकांना प्राणाला मुकावे लागले. पन्नासवर भाविकांना जखमी व्हावे लागले मात्र अजूनही रविवारी रात्री कथित "दुःख निवारण दरबार " आयोजित करणाऱ्या या संस्थानच्या विश्वस्थांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. मुळात बाबूजी महाराज संस्थान वर लहान मुलाची समाधी असेल तर दर रविवारी हे लहान मूळ कुणाच्याही अंगात कश्यासाठी येत असेल ? बाबूजी महाराज याना हे गाव जर ग्रामदैवत मानत असेल तर आपले ग्रामदैवत कुणाच्याही अंगात येते हे गावकऱ्यांना मान्य आहे काय ?

अंदाजे ३५ वर्षांपूर्वी या संस्थानची भगवान अर्जुन इंगळे यांनी धर्मादाय आयुक्ताकडे नोंद केल्याची माहिती आहे. दर्शनी भागातच " बाबूजी महाराज खाजगी संस्थान " असा फलक मात्र कुणालाही खटकत नाही. जर सरकार कडे विश्वस्त संस्था म्हणून नोंद असेल तर हे संस्थान खासगी कसे काय होऊ शकते ? जर खासगी असेल तर आजवर सरकारी निधीतून इथे विकासकामे कशी काय झालीत ? हे प्रश्न अनुत्तरित राहतात. इथे केवळ अकोला जिल्हाच नव्हे तर विदर्भ आणि मराठवाड्यातील हजारो भाविक हजेरी लावत असतात. असाध्य आजार,मूल आणि भूत झपाटण्यावर इथे हमखास उपचार केले जातात अशी या संस्थानची ख्याती पसरलेली आहे.

# एकमत हाच लोकशाहीचा मूळ स्वभाव

**स्थानिक स्वराज्य संस्थेची मुहूर्तमेढ १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने रचली गेली. त्यानुसार निवडणुकीत एकमेकांशी स्पर्धा करून, प्रसंगी साम, दाम, दंड, भेद वापरून एक जण निवडून येणार आणि बाकीचे त्याची ईर्षा धरून पुढच्या निवडणुकीत पुन्हा तोच खेळ करणार. ही गावातल्या स्वशासनाची पद्धत भारतात नव्हती. गावातल्या सर्वांनी एकत्र बसायचे, मतभेद मिटवायचे आणि निर्णय घ्यायचा ही पद्धत प्रचलित होती. हाच भारतीय लोकशाहीचा मूळ स्वभाव होता. लोकशाहीच्या मुळाशी संविधानिक रचनांना जोडण्याची ताकद पेसा कायदा करू शकला असता, मात्र तसे झाले नाही.**

लॉर्ड हार्डिंग्ज भारताचा गव्हर्नर जनरल असताना त्याने १९०९ मध्ये 'रॉयल डिसेंट्रलायझेशन कमिशन'च्या शिफारशी स्वीकारल्या आणि १९१५ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणण्याचे



मान्य केले. ते करताना मुंबईसारख्या मोठ्या शहरांना स्वशासन झेपेल, तिथे लोकनियुक्त महापौर असावा; मात्र त्याने एकप्रकारे महापालिकेचा प्रवक्ता असल्यासारखे काम करावे, प्रत्यक्ष महापालिका चालवण्याचे काम अधिकारी करतील. इतपत स्वशासन करू द्यायला इंग्रज सरकार तयार होते. छोट्या शहरांनाही हे एवढ्यात जमणार नाही, असे तेव्हाच्या सरकारचे मत होते, तर गावांना स्वशासनाचे अधिकार देणे त्यावेळी कल्पनेच्याही पलिकडे होते. स्वतंत्र भारतात या चर्चेची सुरुवात घटना समितीत झाली. गावांमध्ये स्वशासन म्हणजेच पंचायत असावी, असा विषय घटना समितीत अनेक वेळा चर्चेला आला. मोठी चर्चा होऊन विषय स्थगित ठेवला गेला आणि पुन्हा काही महिन्यांनी तो विषय चर्चेला आला. या चर्चेत दोघे-तिघे वगळता बाकी सर्व सदस्यांचे मत पंचायतीचे अधिष्ठान घटनेतच असले पाहिजे, असे होते. त्यात काही ठरेना, तेव्हा शेवटी मसुदा समितीचे तज्ज्ञ सल्लागार बी. एन. राव यांनी सांगितले, की राज्य व केंद्र स्तरावरील व्यवस्था घटनेत विस्तृतपणे दिल्या आहेत. आता जिल्हा, तालुका आणि गावाच्याही रचना घटनेतच द्यायच्या झाल्यास घटनेची लांबीही वाढेल आणि ही घटना स्वीकारून देशाचा कारभार सुरू व्हायलाही उशीर होईल. त्यापेक्षा पंचायतराज घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये घेऊ. पुढे त्याबाबत जे कायदे करायचे ते करायला संसद समर्थ आहे.

१९९२ मध्ये ७३वी घटनादुरुस्ती होऊन त्रिस्तरीय पंचायतराज देशात लागू झाले; मात्र त्याच घटनादुरुस्तीत असेही म्हटले होते, की विधिमंडळाने वेगळा कायदा केल्याशिवाय हे पंचायतराज अनुसूचित क्षेत्रात मात्र लागू होणार नाही. त्यानूनच मध्य प्रदेशातील खासदार दिलीपसिंह भुरिया यांच्या अध्यक्षतेत एक संसदीय समिती नेमण्यात आली.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।  
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥  
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।  
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करावी!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



।मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**ग्रामीण भागातील दिव्यांग आणि पालात राहणाऱ्या नागरिकांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करावी. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या धर्तीवर भूमिहीन शेतमजुरांसाठी योजना तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिले.**

सह्याद्री अतिथीगृह येथे आमदार बच्चू कडू यांच्या मतदारसंघातील विविध विषयांसंदर्भात आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी वरील सूचना केल्या. यावेळी सहकार मंत्री अतुल सावे, आमदार बच्चू कडू, राजकुमार पटेल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

बच्चू कडू यांनी दिव्यांग तसेच गावोगावी पालात राहणाऱ्या नागरिकांसाठी घरकुल योजना असावी अशी मागणी केली होती. यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतंत्र घरकुल योजना तयार करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले.



राज्यात बांधकाम महामंडळाच्या धर्तीवर घरेलु कामगार यांच्यासाठी मंडळ करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शेतमजुरांसाठी योजना करण्याबाबतच्या मुद्द्यावर यावेळी चर्चा करण्यात आली. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या धर्तीवर भूमीहिन शेतमजूरांसाठी योजना करावी, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी घेतला. बार्टी, सारथी, टीआरटीआय,महाज्योती या संस्थांच्यावतीने पीएचडीसाठी दिल्या जाणाऱ्या फेलोशीपकरीता एक सर्वंकष समान धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

या मागणी संदर्भात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने बुधवारी सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि शिष्टमंडळाचे प्रतिनीधी उपस्थित होते. यावेळी ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची मागणी मुख्यमंत्री शिंदे यांनी मान्य केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री शिंदे यांनी पुढील वर्षापासून बार्टी, सारथी, टीआरटीआय,महाज्योती या संस्थांच्यावतीने पीएचडीसाठी दिल्या जाणाऱ्या फेलोशीपकरीता एक सर्वंकष समान धोरण तयार करण्यात यावे, असे निर्देश दिले.

---

# शरद पवारांबाबत काँग्रेस नेत्याचा गौप्यस्फोट!

### दिल्लीत ठरलं मात्र मुंबईत....

।मुंबई।।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।



अदानी प्रकरणाच्या जेपीसी चौकशीच्या मागणीला निरर्थक ठरवून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकीय खळबळ माजवली होती. शरद पवार यांच्या वक्तव्यानंतर महाविकास आघाडीत अंतर्गत कलह वाढला होता. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी देखील शरद पवार यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला होता. त्यानंतर शरद पवार यांनी मवाळ भूमिका घेत नवीन वक्तव्य केले. दरम्यान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी गौप्यस्फोट केला आहे.


अदानी समूहावरील आरोपांची संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) चौकशी करण्याच्या मागणीशी सहमत नसलो तरी विरोधी पक्षांच्या ऐक्यासाठी त्यांच्या भूमिकेच्या विरोधात जाणार नाही, असे शरद पवार म्हणाले होते. त्यामुळे राष्ट्रवादीत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्याम काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गौप्यस्फोट केला आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "दिल्लीत २० पक्षांनी एक सामायिक आघाडी स्थापन केली आणि अदानी प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली. सर्वांनी जेपीसीची मागणी केली. मुंबईत आल्यावर शरद पवार यांनी एक वेगळं विधान केले. पण आम्ही आमच्या मतावर ठाम आहोत. शरद पवारांनी म्हटलं की १९ पक्षांना JPC हवी असेल तर त्यांना आक्षेप नाही."शरद पवार खरे बोलले की जेपीसीमध्ये सत्ता पक्षाचे बहूमत असेल पण त्यामध्ये सत्यशोधक होते. याबाबत देशात चर्चा होऊ शकते, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. शरद पवार यांनी यापूर्वी जेपीसी स्थापन केल्यास संसदेतील संख्याबळ पाहता त्यात (समितीत) सत्ताधारी भाजपचे बहुमत असेल आणि त्यामुळे अशा चौकशीच्या निकालावर शंका निर्माण होईल, असे म्हटले होते.

---

# कोरोना वाढवतोय चिंता

## 24 तासांत राज्यात 1115 नवीन कोरोना रुग्ण तर 9 जणांचा मृत्यू



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रात पुन्हा एकदा कोरोना संक्रमितांची भीतीदायक वाढ झाली आहे. राजधानी दिल्लीसह महाराष्ट्रात कोरोनाचे नवीन रुग्ण समोर येत आहेत. गेल्या 24 तासांत महाराष्ट्रात कोरोनाचे 1 हजार 115 नवे रुग्ण आढळून आले आहेत. तसेच, 9 जणांचा मृत्यूही झाला आहे

महाराष्ट्राच्या आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या अहवालानुसार, राज्यातील कोरोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्या 5421 वर पोहेचली आहे. गेल्या 24 तासांत महाराष्ट्रात 560 रुग्ण बरे झाले आहेत. राज्यात कोरोनामुळे मृत्यूचे प्रमाण 1.82 टक्के असून बरे होण्याचे प्रमाण 98.11 टक्के आहे.

**मुंबई महापालिकेच्या सर्व रुग्णालयात मास्क अनिवार्य**

कोरोना पुन्हा एकदा डोकं वर काढत आहे. यामुळे मुंबई महापालिकेने तयारी सुरु केली आहे. मुंबई मगापालिकेच्या सर्व रुग्णालयात मास्क अनिवार्य करण्यात आले आहेत. तसेच, मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयात आणि महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना मास्क सक्ती करण्यात आली आहे.गेल्या 24 तासांत भारतात कोरोना विषाणूचे सुमारे 8 हजार नवीन रुग्ण आढळले आहेत. आता देशातील सक्रिय रुग्णांची संख्या 40 हजार 215 झाली आहे. बुधवारी सकाळी आलेल्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत 5 लाख 31 हजार 16 लोकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.

### सतर्क राहण्याची गरज

» देशात वाढणारी कोरोना रुग्णसंख्या लक्षात घेता, केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी कोरोनाच्या व्यवस्थापनासाठी सार्वजनिक आरोग्य सज्जतेचा आणि राज्यांसह कोरोना लसीकरणासंदर्भात आढावा घेतला. केंद्रीय आरोग्यमंत्री मांडविया यांनी सांगितले की, आपल्याला अधिक काळजी घ्यावी लागणार असून सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. लोकांमध्ये अनावश्यकपणे भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये याची काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले. राज्यातील कोरोनाची स्थिती पाहता आरोग्य सुविधा, पायाभूत सुविधांचा आढावा घेण्याचे निर्देश त्यांनी सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांना दिले आहेत.

### थर्मल स्कॅनिंग सुरु

**» कोरोनाच्या वाढत्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, राज्यात येणाऱ्या प्रवाशांचे थर्मल स्कॅनिंग सातत्याने केले जात आहे. कोरोना चाचणीसाठी 2 टक्के नमुने घेण्यात आले आहेत. दुसरीकडे, देशाची राजधानी दिल्लीतही कोरोनाच्या रुग्णांमझध्ये सातत्याने वाढ होत आहे. मंगळवारी दिल्लीत कोरोनाचे सुमारे 1 हजार नवीन रुग्ण आढळले.**



# कर्नाटक भाजपात फूट?

## उमेदवार यादी जाहीर होताच माजी उपमुख्यमंत्र्यांचा राजीनामा

**। कर्नाटक महाईन्यूज ।**

कर्नाटकात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. काँग्रेस, आपने उमेदवारांची नावे जाहीर केल्यानंतर भाजपानेही आज उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. परंतु, या यादीत नाव न आल्याने नाराज झालेले माजी उपमुख्यमंत्री लक्ष्मण सावजी यांनी विधान परिषद सदस्य आणि भाजपा पक्षाचा राजीनामा दिला आहे. निवडणूक तोंडावर आलेली असताना भाजपातील या घडामोडींमुळे कर्नाटक विधानसभा निवडणूक वादळी ठरण्याची शक्यता आहे. सावजी यांच्यापाठोपाठ पक्षात इतरही अनेक इच्छुक नाराज असल्याचं बोललं जात आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने मंगळवारी १८९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीवरुन आता आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. कर्नाटकचे माजी उपमुख्यमंत्री लक्ष्मण सावजी यांचे अथानी मतदारसंघातील तिकिट कापण्यात आले. त्यामुळे नाराज झालेल्या सावजी यांनी विधान परिषद सदस्य आणि पक्षाचा राजीनामा दिला. "मी हातात कटोरा घेऊन फिरणाऱ्यांपैकी नाही. मी एक स्वाभिमानी राजनेता आहे. मी कोणाच्याही दबावाखाली काम करत नाही," अशी प्रतिक्रिया लक्ष्मण सावजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.आमदार महेश कुमथल्ली यांना बेळगाव जिल्ह्यातील अथानी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. सावजी अथानी मतदारसंघातून तीनवेळा आमदार



म्हणून निवडून आले आहेत. परंतु, २०१८ मध्ये ते कुमथल्ली (तेव्हा ते काँग्रेसमध्ये होते) यांच्याकडून सावजी यांचा पराभव झाला.

गुरुवारी सायंकाळी सावजी मोठा निर्णय घेणार असून शुक्रवारपासून या निर्णयाची अंमलबजावणी करणार असल्याचीही घोषणा लक्ष्मण सावजी यांनी केली आहे.

### बोम्मई म्हणतात सर्वच खूश

» पहिल्याच उमेदवार यादीमुळे नाराजीनाट्य रंगलेलं असताना कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराव बोम्मई यांनी मात्र हा दावा फेटाळून लावला आहे. उमेदवारांच्या यादीला सर्वांची सहमती असून या निर्णयावरून सर्व खूश आहेत, असं बोम्मई म्हणाले.

**जगदीश शेट्टार यांनाही वगळलं**

भारतीय जनता पार्टीकडून सहा वेळा आमदार राहिलेल्या जगदीश शेट्टार यांनाही पहिल्या यादीतून वगळण्यात आलं आहे. उमेदवारांच्या पहिल्या यादीत नाव न आल्याने जगदीश शेट्टार आता थेट दिल्लीदरबारी जाणार आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्याशी चर्चा केल्यानंतर सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

---

## भुषा गावात प्रथमच पोहचली वीज!

### लख्ख प्रकाशामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

**भुषा (ता. दडगांव)** : तालुक्यातील नर्मदा नदी किनारी अतिदुर्गम डोंगराळ भागातील भुषा (ता. दडगांव) गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच वीज पोहचली आहे. येथील ग्रामस्थांनी आपल्या स्वत:च्या गावात पहिल्यांदाच वीज पाहिल्याने व त्याद्वारे गावात पहिल्यांदाच लख्ख प्रकाश पाहून आनंद आणि समाधान व्यक्त केले आहे.

धडगांवपासून ४० किलोमीटर अंतरावर भुषा



हे छोटेसे गाव वसलेले आहे. स्वातंत्र्यानंतर ७२ वर्षात प्रथमच महाराष्ट्र राज्य विज वितरण महामंडळ विभागामार्फत गावात प्रथमच वीज पोहचली.

भुषा हे गाव वर्षानुवर्षे रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज आदी सोयी-सुविधांपासून वंचित राहिले आहे. भुषा गावाकडे स्थानिक प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी कधीच लक्ष न दिल्याने गाव विकासापासून कोसो दुर आहे. आता मात्र गावातील युवक आधुनिक युगात उच्च शिक्षणाच्या आधारे गावाच्या विकासासाठी धडपड करीत असल्याने त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

---

## खराब झालेल्या गव्हाचीही खरेदी करणार

### पंजाब सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**केंद्राने पंजाब आणि हरियाणामधून गहू खरेदीसाठी गुणवत्तेचे निकष शिथिल करून ६ टक्क्यांच्या मर्यादेच्या तुलनेत १८ टक्क्यांपर्यंत परवानगी दिली आहे. मात्र, धान्य खरेदीवर मूल्यकपात लागू केली आहे. त्यामुळे आता खराब झालेल्या गव्हाचीही सरकार खरेदी करणार आहे.**

पंजाब अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे की, एकसमान वैशिष्ट्यांनुसार धान्याची मर्यादा १८ टक्क्यांपर्यंत शिथिल केली जात आहे आणि प्रत्येकासाठी एक चतुर्थांश मूल्य कपात केली आहे.

"पंजाबमधील शेतकऱ्यांना पेमेंट करताना राज्य सरकारने गव्हाच्या किमान आधारभूत किंमतीतून (एमएसपी) २,१२५ रुपये प्रति क्विंटल वजा केले पाहिजेत. ६ टक्क्यांपर्यंत मुरलेल्या आणि तुटलेल्या गव्हावर मूल्यकपात लागू होणार नाही," असं पत्रात नमूद केलं आहे.

परंतु केंद्राने ५.३१ रुपये ते ३१.८७ रुपये प्रति क्विंटल



मूल्यात कपात केली आहे. ६ ते ८ टक्क्यांपर्यंतच्या तुटलेल्या धान्यांसाठी प्रति क्विंटल ५.३१ रुपये आणि १०.६२ रुपयांच्या मूल्य कपातीसाठी ८ ते १० टक्के मूल्य कपात करण्यात आली आहे. हरियाणाच्या अन्न पुरवठा आणि ग्राहक व्यवहार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना तशाच प्रकारचं पत्र

---

## कोलकाता मेट्रोने रचला इतिहास

**। कोलकाता । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

कोलकाता मेट्रोने बुधवारी गंगा (हुगळी) नदीखालून हावडा मैदानापर्यंत पहिला मेट्रो चालवून इतिहास रचला. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर देशातील पहिली मेट्रो ट्रेन नदीखाली धावली. हा भारतातील पहिला 'अंडरवॉटर मेट्रो' प्रकल्प आहे.

बीबीडीबाग महाकरणपासून हावडा मैदान स्टेशनपर्यंत मेट्रो ट्रेन क्रमांक एमआर-612 (MR-612) हा प्रथमच चालविण्यात आली. सकाळी 11.55 वाजता या मेट्रो ट्रेनने हुगळी नदी पार केली. यावेळी कोलकाता मेट्रो रेल्वेचे महाव्यवस्थापक पी उदय कुमार रेड्डी यांच्यासोबत मेट्रोचे अतिरिक्त महाव्यवस्थापक एच. एन. जयस्वाल, कोलकाता मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे (KMRCL) एमडी आणि मेट्रोचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित

### नदीखालून धावली पहिली ट्रेन



होते. ट्रेन पोहोचल्यावर रेड्डी यांनी हावडा स्टेशनवर पूजा केली.

दोन मेट्रो ट्रेन आज, बुधवारी कोलकाता येथील एस्प्लेनेड स्थानकावरून हावडा मैदान स्थानकापर्यंत चालविण्यात आले. लवकरच या 4.8 किमी भूमिगत भागावर चाचणी लवकरच सुरू होणार आहे. हा मार्ग सुरू झाल्यानंतर हावडा हे देशातील सर्वात खोलवर असलेले मेट्रो स्टेशन (पृष्ठभागापासून 33 मीटर खाली) असेल.

### सात महिने सुरू राहील ट्रायल रन

» यानंतर, दुसरी मेट्रो ट्रेन एमआर-613 (MR-613) देखील हावडा मैदान स्टेशनवर नेण्यात आली. ही ऐतिहासिक घटना असल्याचे सांगून रेड्डी म्हणाले की, हावडा मैदान ते एस्प्लनेड ही चाचणी पुढील सात महिने सुरू राहील आणि त्यानंतर या भागात नियमित सेवा सुरू होईल.

# उर्मिला कानेटकर साकारणार मंजुळा सातारकर!'

मराठी मनोरंजन विश्वातील एक देखणी आणि कसदार अभिनय करणारी अभिनेत्री म्हणजे उर्मिला कोठारे. गेली अनेक वर्षे ती मनोरंजन विश्वात कार्यरत आहे. अभिनेत्री म्हणून ती चर्चेत आहेच पण ती कोठारे घराची म्हणजे महेश कोठारे यांची सून आहे.गेली काही दिवस तिच्या कामपेक्षा तुझ्या वैयक्तिक आयुष्याचीच चर्चा अधिक आहे. पण पुन्हा एकदा उर्मिला आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकायला तयार आहे. एका आगळ्यावेगळ्या भूमिकेत उर्मिला पुन्हा एकदा मालिका विश्वात पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे आणि उर्मिलाला पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत.स्टार प्रवाहवरील "तुझेच मी गीत गात आहे" या मालिकेत उर्मिला पुन्हा एंट्री करणार आहे. या मालिकेत स्वराज आणि मल्हारचं नातं निर्णायक वळणावर येऊन पोहोचलं आहे. मल्हारच आपले वडील आहेत ही गोष्ट स्वराजला कळली आहे.

इतकी वर्ष वडिलांच्या प्रेमासाठी आसुसलेल्या स्वराज म्हणजेच स्वराच्या आयुष्यातला हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. मल्हारला ही गोष्ट स्वराज सांगू इच्छित असला तरी नियतीच्या मनात मात्र दुसरंच काहीतरी आहे. मल्हारला बाबा अशी हाक मारण्याचा क्षण आयुष्यात येण्यापूर्वीच स्वराजने अपघातात त्याचा आवाज गमावलाय. स्वराज त्याच्या मनातली भावना कशी व्यक्त करणार हे मालिकेतील पुढील भागांमधून उलगडेल. स्वराज आणि



# रणवीर सिंग ला सोडून एकटी व्हॅकेशनवर गेलीय दीपिका

अभिनेत्री दीपिका पदूकोण आणि रणवीर सिंग यांच्या वैवाहिक आयुष्या संबंधित अनेक वावड्या गेल्या काही दिवसांपासून उठताना दिसत आहेत. सोशल मीडियावर चर्चा सुरु आहे की दोन स्टार्समध्ये सध्या सगळं काही ठीक नाही.आता याच बातम्यां दरम्यान दीपिका पदूकोण एकटीच व्हॅकेशनवर गेल्यनं अनेकांना थोडं खटकलं आहे. दीपिका पदूकोणचे भूतान व्हॅकेशनचे फोटो सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होताना दिसत आहेत,ज्यांना पाहिल्यावर लोकांमध्ये पुन्हा तिच्या आणि रणवीरच्या घटस्फोटाची चर्चा रंगली आहे. दीपिका 'फायटर' सिनेमाचं शेड्युल आटपल्यावर 'पठाण' सिनेमाचं यश सेलिब्रेट करण्यासाठी थेट भूतानला व्हॅकेशनसाठी पोहोचली होती. अभिनेत्रीनं तिथे आपल्या चाहत्यांसोबत फोटो क्लिक केले जे सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. दीपिका पदूकोणच्या भूतान व्हॅकेशनच्या फोटोंवर अनेक लोक प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. अनेकांनी तर एकच प्रश्न विचारला आहे की, 'रणवीर सिंग कुठे गायब आहे?' रणवीर सिंग शिवाय दीपिकाचं व्हॅकेशन एन्जॉय करणं लोकांना मुळीच आवडलेलं नाही.दीपिका पदूकोण लवकरच अनेक बड्या सिनेमातून धमाकेदार परफॉर्मन्स करताना दिसणार आहे. मीडियाला मिळालेल्या माहितीनुसार,दीपिका प्रभास आणि अमिताभ बच्चनसोबत 'प्रोजेक्ट के' मध्ये दिसणार आहे. तसंच,हृतिक रोशन सोबत 'फाइटर' सिनेमात जबरदस्त ॲक्शन करताना दिसणार आहे. 'फाइटर' सिनेमा २५ जानेवारी,२०२४ रोजी रिलीज होईल.

तर रणवीर सिंगच्या आगामी सिनेमांवर नजर टाकली तर त्याचे काही खास सिनेमे पाइपलाइनमध्ये दिसत नाहीत.

रिपोर्टअनुसार, रणवीरकडे सध्या फक्त रोहित शेट्टीच्या पोलिस कॉप सीरिजच्या एका सिनेमाची ऑफर आहे.



# शाहरुखची लाडकी लेक बनली

शाहरुख खान आणि गौरी खानची लाडकी सुहाना खानला तिच्या बॉलिवूड पदार्पणापूर्वीच एक मोठी संधी मिळाली आहे. सुहाना आता एका मोठ्या ब्रँडची ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे. सुहाना खान बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे आणि त्याआधीच तिने जाहिरातींच्या दुनियेत पाऊल ठेवले आहे. सुहाना न्यूयॉर्क स्थित ब्युटी ब्रँड 'मेबलिन'ची ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे.

सोमवारी मुंबईत आयोजित एका मीडिया इव्हेंटमध्ये सुहानाच्या संदर्भात ही घोषणा करण्यात आली. सुहाना खान या वर्षी झोया अख्तरच्या 'द आर्चीज' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवणार आहे आणि त्याआधी एका आंतरराष्ट्रीय ब्रँडशी तिच्या संलग्नतेमुळे तिचा पोर्टफोलिओ आणखी प्रभावी झाला आहे. या इव्हेंटमध्ये सुहाना खूपच सुंदर दिसत होती.या प्रसंगाचे अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या कार्यक्रमात सुहानाने पहिल्यांदाच मीडियाशी संवादही साधला. सुहाना म्हणाली की, ब्रँड ॲम्बेसेडर होण्यासाठी आणि या ब्रँडचा एक भाग बनून मला खूप आनंद होत आहे.

सुहाना खान लवकरच नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या द आर्चीज या चित्रपटात दिसणार आहे. झोया अख्तर दिग्दर्शित या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले आहे. हा एक लाईव्ह-ॲक्शन म्यूजिकल फिल्म आहे. सुहाना खान व्यतिरिक्त दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांची दुसरी मुलगी खुशी कपूर आणि अमिताभ बच्चन यांची नात अगस्त्य नंदा देखील पदार्पण करत आहेत.

आम्ही तुम्हाला सांगतो की 'द आर्चीज' हा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणारा सिक्वेल चित्रपट आहे. या चित्रपटाची कथा 1960 च्या दशकातील आहे. 'द आर्चीज'ची कथा कॉमिक बुक कॅरेक्टर आर्ची एंड्रयूज आणि त्याच्या मित्रांवर आधारित आहे.



# महेंद्रसिंग धोनीची मनोरंजन क्षेत्रात नवी इनिंग

भारताचा धडाकेबाज फलंदाज महेंद्रसिंग धोनी क्रिकेटनंतर आता मनोरंजन विश्वातही आपलं नशीब आजमावणार आहे. यावर्षी जानेवारीमध्ये त्याने आपल्या धोनी एंटरटेनमेंटच्या प्रोडक्शन हाऊसच्या पहिल्या चित्रपटाची घोषणा केली होती. आता धोनीने या चित्रपटाचे पोस्टर रिलीज केले आहे. धोनीने दाक्षिणात्य चित्रपटाची निर्मिती केली आहे. एलजीएम : लेट्स गेट मॅरिड' (LETS GET MARRIED) असे धोनीने निर्मीती केलेल्या पहिल्या चित्रपटाचे नाव आहे.लेट्स गेट मॅरीडच्या निर्मितीसोबतच साक्षी धोनीने चित्रपटाच्या संकल्पनेवरही काम केले आहे. एलजीएमचे दिग्दर्शन रमेश तमिलमणी करत आहेत. लेट्स गेट मॅरीड हा त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. . तसेच या सिनेमातील गाणीदेखील त्यांनीच संगीतबद्ध केली आहेत.

एमएस धोनीने लेट्स गेट मॅरीडचे पोस्टर रिलीज केले आहे. पोस्टरवर लोकांनीही आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका यूजरने कमेंट केली, "अभिनंदन धोनी गारु, तुमच्या आगामी प्रोजेक्टसाठी खूप खूप अभिनंदन." आणखी एका युजरने म्हटले की, "अभिनंदन आणि सिनेमात स्वागत आहे."

आपला आनंद व्यक्त करताना धोनीच्या एका चाहत्याने म्हटले, "एखाद्या डाय हार्ड फॅनने आणखी काय मागावे? धन्यवाद सर."



# जडू-माहीचे प्रयत्न अपयशी!

## राजस्थानचा चेन्नईवर तीन धावांनी थरारक विजय

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ मध्ये बुधवारी (१२ एप्रिल) चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्या दरम्यान सामना खेळला गेला. राजस्थानच्या रजवाड्यांनी चेन्नई सुपर किंग्सवर ३ धावांनी रोमांचक विजय संपादन केला. शेवटच्या षटकात संदीप शर्माने अप्रतिम शेवटचे दोन यॉर्कर चेंडू टाकत संघाला विजय मिळवून दिला. राजस्थानच्या चांगल्या सुरुवातीनंतरही अनुभवी रवींद्र जडेजा याने किफायतशीर गोलंदाजी करत राजस्थानला रोखण्याचे काम केले. यासोबतच त्याने आपल्या टी२० कारकिर्दीतील एक खास टप्पा देखील पार केला पण फलंदाजीतील त्यांचे प्रयत्न कमी पडले. आर. अश्विनला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.**



शेवटच्या चार षटकात चेन्नईचे खंदे शिलेदार धोनी आणि जडेजाने विजयानजिक नेण्याचा प्रयत्न केला पण विजयी सीमारेषा पार करण्यात अपयशी ठरला. अवघ्या तीन धावांनी चेन्नईचा पराभव झाला. धोनीच्या पराक्रमानंतरही सीएसकेचा राजस्थानविरुद्धचा सामना तीन धावांनी हरला. संदीप शर्माने शेवटच्या तीन चेंडूत ७ धावांचा बचाव करत अप्रतिम कामगिरी केली. शेवटच्या षटकात विजयासाठी २१ धावांची गरज होती. धोनीने २ षटकार मारून सामना विजयाच्या जवळ आणला होता. मात्र संदीप शर्माने अनुभवाच्या जोरावर धोनीच्या संघाचा पराभव केला. राजस्थानने चेन्नईसमोर विजयासाठी १७६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. धोनीच्या संघाला केवळ १७२ धावाच करता आल्या.राजस्थानने ठेवलेल्या १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऋतुराज गायकवाडला ( ८) आज अपेक्षित सुरुवात करता आली नाही. संदीप शर्माने दुसऱ्या षटकात त्याला झेलबाद केले. डेव्हिड कॉनवेला जीवदान मिळाले. ॲडम झम्पाच्या गोलंदाजीवर संदीप शर्माने डीप स्क्वेअर लेगला हा झेल टाकला. या दोघांनी आतापर्यंत ४० चेंडूंत ६३ धावांची भागीदारी केली. अजिंक्यचे लक्ष विचलीत करण्यासाठी अश्विनने डाव खेळला. अजिंक्य पुढे येऊन फटका मारण्यासाठी येताच अश्विनने गोलंदाजी करणे टाळले. त्यानंतर पुढच्या चेंडूवर अश्विन गोलंदाजीसाठी क्रिजपर्यंत आल्यावर अजिंक्य बाजूला सरकला. अजिंक्यच्या या प्रतिक्रियेने स्टेडियमवर प्रेक्षक खूश झाले. त्यानंतर काही चेंडूनंतर अजिंक्यने खणखणीत षटकार मारला.

डेव्हॉन कॉनवे आणि अजिंक्य रहाणे यांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. रहाणे १९ चेंडूत ३१ धावा करून बाद झाला. शिवमने ८ धावा केल्या. यानंतर मोईन अली, अंबाती आणि डेव्हॉन कॉनवे सात चेंडूंच्या आत पॅव्हेलियनमध्ये परतले. कॉनवे अर्धशतक झळकावून बाद झाला. शेवटच्या षटकात जडेजा आणि धोनीने मोठे फटके मारत संघाला विजयाच्या जवळ आणले, मात्र ते अपयशी ठरले. राजस्थानकडून अश्विन आणि चहलने प्रत्येकी विकेट्स घेत मधल्या षटकात चेन्नईच्या डावाला लगाम घातला त्यांना झॅम्पा आणि संदीप शर्मा यांना प्रत्येकी एक विकेट घेत मोलाची मदत केली.

तत्पूर्वी, राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांनी शानदार कामगिरी केली. सलामीवीर यशस्वी जैस्वाल अपयशी ठरला, पण देवदत्त पडिक्कल आणि जॉस बटलर यांनी चेन्नईच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. अष्टपैलू आर अश्विननेही चांगली फटकेबाजी केली. पडिक्कल व अश्विन या दोघांना फिरकीपटू मोईन अलीने स्लीपमध्ये झेल सोडून जीवदान दिले आणि तिथेच चेन्नईने स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. पडिक्कल व बटलर यांनी ४१ चेंडूत ७७ धावांची भागीदारी केली.

# एकदिवसीय विश्वचषकाच्या सामन्यांसाठी पाकिस्तानची चेन्नई, कोलकाताला पसंती?

## 'आयसीसी'कडूनच सामन्यांसाठी चेन्नई व कोलकाता या केंद्रांची शिफारस

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**या वर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सामने खेळण्यासाठी पाकिस्तानचा संघ चेन्नई आणि कोलकाताला पसंती देण्याची शक्यता आहे. पाकिस्तानला यापूर्वीच्या भारत दौऱ्यात चेन्नई आणि कोलकाता ही दोन केंद्रे सुरक्षित वाटली होती, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) सूत्रांनी म्हटले आहे. विश्वचषक स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून एकूण ४६ सामने देशातील विविध १२ केंद्रांवर खेळवले जाणार आहेत.**



यामध्ये मुंबई, अहमदाबाद, लखनऊ, राजकोट, बंगळूरु, दिल्ली, इंदूर, गुवाहाटी, हैदराबाद आणि धरमशाला या केंद्रांचा समावेश आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळ (पीसीबी) आणि 'आयसीसी'च्या पदाधिकाऱ्यांमध्ये विश्वचषक स्पर्धेतील सामन्यांवरून बरीच चर्चा झाल्याची माहिती आहे, परंतु या चर्चेतून अजूनही तोडगा निघालेला नाही. भारत सरकार आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) काय भूमिका घेते यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतील. या पार्श्वभूमीवर, 'आयसीसी'कडूनच पाकिस्तानच्या सामन्यांसाठी चेन्नई व कोलकाता या केंद्रांची शिफारस होऊ शकते, असे 'आयसीसी'च्या सूत्रांनी सांगितले.

# नंदलाल झा शरीरसौष्ठवमध्ये सर्वश्रेष्ठ

। सांगली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मिरजेत झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या नंदलाल झा यांने भारत सर्वश्रेष्ठ किताब पटकावला. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रासह तामिळनाडू, गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटकसह विविध राज्यातील दीडशे स्पर्धक सहभागी झाले होते.

श्री अंबाबाई तालीम संस्थेच्या एसबीजीआय क्रीडांगणावर झालेल्या दोन दिवसांच्या शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये विविध गटातून स्पर्धकांनी आपले कौशल्य सादर केले. ॲम्युच्युअर बॉडीबिल्डिंग असोसिएशन, फिसिक स्पोर्ट्स फेडरेशन आणि महाराष्ट्र हौशी शरीरसौष्ठव संघटना यांच्यावतीने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत प्रथम सहभाग विजेता म्हणून अजिंक्य पवार, मास्टर विजेता म्हणून शाश्वत मानक, सब ज्युनिअरमध्ये मध्य प्रदेशचा दक्ष हळदकर, ज्युनिअरमध्ये कर्नाटकचा सुशील कुमार, वरिष्ठ गटात सीताराम झा, मेन्स फिजीक्युमध्ये कर्नाटकचा दिलीप कुमार आणि महिलामध्ये हिरा सोळंकी हे विजेते ठरले. भारत सर्वश्रेष्ठचा मानकरी ठरलेल्या झा याला एक लाख रूपये आणि स्मृतीचिन्ह व अन्य विजेत्यांना स्मृती चिन्ह व रोख २५ हजार रूपये असे बक्षिस अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष संजय भोकरे व माजी नगरसेवक महमंद मणेर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन श्रीकांत परब, नारायण सावंत यांनी केले होते.

